# Ep1 - What is CineGappa?



नमस्कार, माझं नाव आशय जावडेकर. मी एक फिल्ममेकर आणि इंजिनीयर आहे. मला सिनेमे बघायला प्रचंड आवडतं आणि त्याविषयी बोलायला त्याहून जास्त. मी अमेरिकेत इंजिनीरिंग मध्ये **PhD** करत असताना मला सिनेमाचं वेड लागलं आणि मी सिनेमे बनवायला पण लागलो. हे सिनेमे बघताना, बनवताना मला जे काही शिकायला मिळतं, अनुभवायला मिळतं, त्याविषयी मी गप्पा मारणार आहे. **That’s Cinegappa!**




मी माझी थोडक्यात ओळख करून देतो. मी सध्या अमेरिकेमध्ये राहतो आणि गेली ९-१० वर्षे मी इथे फिल्म्स करतो आहे. मी नुकतीच एक **Shanks** नावाची एक **feature film** केली. ही फिल्म **Amazon Instant Video** वरती **US, UK, Germany** आणि **Japan** मध्ये बघायला उपलब्ध आहे (click here), आणि बाकीच्या देशांमध्ये **(including India)** आमचे प्रयत्न चालू आहेत ती फिल्म कुठल्या ना कुठल्या माध्यमातून प्रदर्शित करायचे. माझ्या आधीच्या फिल्म्स तुम्हाला बघायच्या असतील तर माझ्या http://www.ashayjavadekar.com या **website** वरती त्या उपलब्ध आहेत.

मी जरी गेली ९-१० वर्षे फिल्म्स करत असलो तरी माझं शिक्षण **filmmaking** मधलं नाही. मी **UDCT** मुंबई इथून **Chemical Engineering** मध्ये शिक्षण घेतलं, आणि मग अमेरिकेमध्ये त्याच विषयात **PhD** करायला आलो. मी जेव्हा इथे आलो तेव्हा मला असं जाणवलं की जर तुम्हाला तुमचा मुख्य विषय सोडून बाकीच्या कुठल्या विषयामध्ये रस असेल तर शिक्षण घ्यायची इच्छा असेल, तर त्या शिक्षणाचा **access** तुम्हाला त्याच युनिव्हर्सिटीच्या परिसरात **(campus)** मध्ये असू शकतो. माझं तसंच झालं. मला आधीपासूनच **movies** आणि **theater** मध्ये आवड होती आणि आमच्या युनिव्हर्सिटीच्या लायब्ररी मध्ये एक **movie department** होतं. तिथे जगभरातले सिनेमे, वेगवेगळ्या माध्यमातून, म्हणजे **DVDs, Blurays,** १६ **mm** फिल्म, असे उपलब्ध होते. ही लायब्ररी युनिव्हर्सिटी ची असल्याने आणि मी त्याच युनिव्हर्सिटी चा विद्यार्थी असल्याने मी अर्थातच हे सिनेमे **free of cost** उपलब्ध होते. तिथे मग मला सिनेमे बघायचं वेड लागलं आणि मी ३ वर्षे, दररोज एक, असे तिथे सिनेमे बघितले. हे सिनेमे बघत असताना, त्याच्या **DVDs** चा **special features** मध्ये काही ते सिनेमे कसे बनवले गेले याचे माहितीपट होते, ते मी पाहिले आणि तेव्हा मला सिनेमे कसे बनवतात याची थोडीफार ओळख झाली.

**Turning Point** तेव्हा आला जेव्हा याच लायब्ररी मध्ये त्याच **movie department** च्या शेजारी एक **multimedia design center** उघडलं, जिथे **industry standard filmmaking equipment, editing softwares** सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली गेली. तेव्हा मग माझ्यासमोर एक मोठं ज्ञानाचं दालन उघडलं. मी तिथे **editing** शिकलो, **filmmaking** शिकलो आणि मग मी फिल्म्स बनवायला लागलो.

या फिल्म्स बनवताना मी नेहमी एक विचार डोक्यात ठेवतो की मला प्रत्येक फिल्म मधून काहीतरी नवीन शिकायला मिळालं पाहिजे. तशी शिकायची गरज मी निर्माण करतो आणि मग तसे प्रोजेक्ट्स निवडतो. तुम्ही माझ्या **website**

वरती माझी पहिली फिल्म बघितलीत तर ती फक्त एका शॉट ची आहे **(no editing)**, कारण मला एडिटिंग च्या आधीचं सगळं तेव्हा शिकायचं होतं. नंतर मी एक १६ **mm** फिल्म वापरून फिल्म केली, एक ऍनिमेशन फिल्म केली, एक **english** फिल्म केली, एक **horror** केली, असे बरेच प्रयोग मी केले आणि अजूनही करतो आहे.



| |
|---|
| हे सगळं करताना माझी इंजिनीरिंग ची एक **stream** समांतर चालूच आहे, आणि मला नेहमी **engineering** मधली **principles** आणि **filmmaking** मधली **principles** यामध्ये साम्य दिसत आलेलं आहे. म्हणजे मी जेव्हा **PhD** करत असताना **technical articles** लिहायचो ते, आणि त्याच वेळेला फिल्म्सच्या **scripts** लिहायचो ते, हे दोन्हीमध्ये खूप साधर्म्य होतं. आत्तासुद्धा मी एका **manufacturing company** मध्ये काम करतो तिथे सुद्धा मला तिथली **manufacturing** ची **principles** आणि फिल्ममेकिंग मध्ये साम्य जाणवत आलेलं आहे. या सगळ्यावरती एक काहीतरी विचारमंथन करावं असं मला खूप वर्षांपासून वाटत होत, त्यासाठी ही "सिनेगप्पा" नावाची **series** मी चालू करतो आहे. " |
| मी याला **series** म्हणतो आहे त्याला एक कारण आहे. मला ज्या काही गप्पा मारायच्या आहेत, त्या केवळ लेखन या एकाच माध्यमातून शक्य नाहीयेत. मला काही गोष्टी ऐकवायच्या आहेत, काही दाखवायच्या आहेत, काही लिहायच्या आहेत. त्यामुळे या लेखनाबरोबरच मी एक **audio podcast** पण चालू करतो आहे. आणि प्रत्येक लेखांशी संबंधित काही **sketches, images, videos** मी माझ्या **CineGappa** या फेसबुक पेज वरती पण टाकणार आहे. या सगळ्यांमधून मला फिल्म्स आणि फिल्ममेकिंगच्या विविध टप्प्यांवर येणारा विज्ञानाचा आणि **engineering** चा संबंध याविषयी बोलायचंय. त्यामुळे या लेखांबरोबरच तुम्ही माझा **podcast** ऐकलात आणि **CineGappa** हे फेसबुक पेज **follow** केलंत, आणि **#cinegappa** ने **social media** वरती ट्रॅक केलंत तर तुम्हाला पूर्ण कल्पना येईल मला काय म्हणायचंय त्याची. " |




सिनेगप्पा म्हणजे काय याची थोडक्यात कल्पना तुम्हाला आता आली असेल. तर मी हा लेख आता इथेच थांबवतो. पुढच्या लेखात / एपिसोड मध्ये आपण **in general,** एक **big picture point of view** ने इंजिनीरिंग आणि फिल्ममेकिंग याविषयी बोलू आणि या दोन्ही गोष्टी मला सारख्या का वाटतात याविषयी थोडंसं चर्विचर्वण करू. मग अजून खोलात त्याच्यापुढच्या लेखांमध्ये जाऊ.




मी या लेखांबरोबरच या लेखांशी संबंधित एक ऑडिओ पॉडकास्ट चालू केला आहे. तो तुम्हाला **Apple** प्लॅटफॉर्म वरती **PodCast app** मध्ये ऐकता येईल, आणि **Android** प्लॅटफॉर्म वरती **Google Play Music app** मध्ये ऐकता येईल. त्याबरोबरच मी काही या लेखांशी संबंधित काही **sketches, images, videos** माझ्या **CineGappa** या फेसबुक पेज वरती शेअर करेन, तर अधिक माहितीसाठी ते **page** नक्की **follow** करा. तुमचे या लेखांविषयीचे विचार मला नक्की कळवा.

**आशय दिलीप जावडेकर**
ashayjavadekar@gmail.com
facebook.com/cinegappa
www.cinegappa.com


सिने गप्पा
Films, Engineering and Beyond...
Listen on Apple Podcasts
Listen on Google Play Music
#CineGappa
The Podcast is in English and Marathi.